वर्ष-०७ | अंक-१० | मुंबई, मंगळवार २६ जानेवारी ते ०१ फेब्रुवारी २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

PG 2

लग्नाच्या आदल्या दिवशी भावानं बहिणीला घातल्या गोळ्या, धक्कादायक कारण उघड

मराठी साप्ताहिक
R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION
NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

• संपादक : दिपक मोरेश्वर नाईक • कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक • सह संपादक : सौ. अश्विनी नाईक परब

3 ⟶ ड्रग्ज प्रकरणी दाऊदच्या भावाचा जवळचा साथीदार एनसीबीच्या जाळ्यात

लग्नाचे दागिने व कपड्यांच्या बॅगांचा शोध लावण्यामध्ये नवघर पोलीसांना ⟵ 4

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page




## पोलिसांसाठी एक लाख घरे बांधणार अनिल देशमुख यांची घोषणा



महाराष्ट्रातील पोलिसांसाठी एक लाख घरे बांधली जाणार, अशी महत्त्वपूर्ण घोषणा राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केली. नागपूरमध्ये पोलीस

...पान २ वर...

## सर्वांसाठी लोकल लवकरच! मुख्यमंत्री उद्धव ठाकरे





**अत्यावश्यक सेवेतील कर्मचारी, महिला प्रवासी, वकील, खासगी व सहकारी बँकांतील मर्यादित कर्मचारी, खासगी सुरक्षारक्षक यांना लोकलची दारे आधीपासूनच उघडली गेली असताना सर्वसामान्य प्रवासी मात्र लोकलच्या प्रतीक्षेत आहेत.**

मुंबई: सर्वांसाठी लोकलचे दरवाजे कधी उघडणार?, हा प्रश्न कळीचा बनला असताना व दूरच्या उपनगरांतून नोकरीनिमित्त मुंबईत येणारे प्रवासी याची चातकाप्रमाणे वाट पाहत असताना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी या सर्वांसाठी दिलासा देणारी बातमी दिली आहे. मुंबईतील लोकल रेल्वे सेवा सर्वांसाठी सुरू करण्यासंदर्भात आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत आढावा घेण्यात आला. यासंदर्भातील निर्णय लवकरच घेण्यात येईल, अशी माहिती मुख्यमंत्री ठाकरे यांनी यावेळी दिली. करोना विषाणूचा प्रादुर्भाव अद्याप संपलेला नसल्याने गर्दी होणार नाही, अशा पद्धतीने लोकल सेवा सर्वांसाठी कशाप्रकारे सुरू करता येईल यादृष्टीने विविध पर्यायांवर आजच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. बैठकीस मुख्य सचिव संजय कुमार, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सल्लागार अजोय मेहता, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव आशिषकुमार सिंह, प्रधान सचिव विकास खारगे, सचिव आबासाहेब जराड, मुंबई महानगरपालिका आयुक्त इक्बालसिंह चहल, आपत्ती व्यवस्थापन संचालक अभय यावलकर यांच्यासह मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक संजीव मित्तल आणि पश्चिम रेल्वेचे महाव्यवस्थापक आलोक कंसल, मुंबई पोलीस आयुक्त परमबीर सिंह व आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

...पान २ वर...

## कोणाला किती मुलं होती मी सांगू का?; अजित पवारांनी घेतला विरोधकांचा समाचार



राष्ट्रवादी कांग्रेसचे नेते आणि सामाजिक न्यायमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर एका महिलेने बलात्काराचा आरोप केल्यामुळे राज्यातील राजकारण चांगलेच ढवळून निघाले आहे. धनंजय मुंडे यांच्यावरील बलात्काराचा आरोप जरी

...पान २ वर...

## 32 वे रस्ता सुरक्षा अभियान चा उद्घाटन सोहळा





दिनांक १८/०१/२०२१ रोजी वाहतूक शाखा वसई विरार याचे संयुक्त विद्यमाने ३२ वे रस्ता सुरक्षा अभियानचा उद्घाटन समारंभ संघवी हॉल, अंबाडी नाका, वसई पश्चिम येथे मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. एस. जयकुमार यांच्या मार्गदर्शनाखाली मा. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२ श्री. संजयकुमार पाटील मा. पोलीस उप आयुक्त ०३ श्री. प्रशांत वाघुंडे यांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन करून प्रारंभ करण्यात आला. सदर कार्यक्रमास प्रतिष्ठीत नागरिक, रिक्षा/ टॅक्सी युनियनचे पदाधिकारी व पत्रकार इलेक्ट्रॉनिक मीडिया याचे प्रतिनिधी तसेच वाहतूक अधिकारी व अंमलदार असे उपस्थितीत होते. सदर कार्यक्रमाचे प्रस्ताविक पोलीस निरीक्षक शेखर डोंबे यांनी केले. पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२ व ०३ यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. पोलीस निरीक्षक विलास सुपे यांनी उपस्थितांचे आभार मानले. सदर कार्यक्रमाचे सूत्र संचालन पोलीस हवालदार राजू गायकवाड यांनी केले. ३२ वे रस्ता सुरक्षा

...पान २ वर...

## शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ उतरले फॅशन स्ट्रीटवरील दुकानदार; आझाद मैदानातील मोर्चाच्या पार्श्वभूमीवर दुकान बंद आंदोलन



शेतकरी आणि कामगार कायद्यांच्या विरोधात राजभवनवर मोर्चासाठी नाशिकहून निघालेले शेतकरी आंदोलक रविवारी मुंबईत दाखल झाले. आझाद मैदानात आज सकाळपासूनच या मोर्चातील शेतकऱ्यांनी घोषणाबाजी करत आपला विरोध नोंदवण्यास सुरुवात केलीय. या मोर्चामधील जाहीर सभेत राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब थोरात आदी सहभागी होणार आहेत. मात्र या मोर्चाला आता मुंबईतील प्रसिद्ध फॅशन स्ट्रीटवरील दुकानादारांनाही पाठिंबा दर्शवत आज दुकानं बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या किसान सभेच्या नेतृत्वाखाली राज्याच्या २१ जिल्ह्यांमधून शेतकरी व कामगार हे नाशिकहून मुंबईत रविवारी संध्याकाळी दाखल झाले. शनिवारी हा मोर्चा वाहनांमधून नाशिकहून मार्गस्थ झाला होता. इगतपुरीत मुक्काम के ल्यावर रविवारी सकाळी घाटनादेवी येथून कसाऱ्यापर्यंत आंदोलक पायी आले. सुमारे तीन तासात घाट उतरून खाली आल्यावर

...पान २ वर...

## १००, १०, ५ रुपयांबद्दल आरबीआयचे स्पष्टीकरण



रिर्झव्ह बँकेचे सहाय्यक व्यवस्थापक बी. महेश यांच्या एका वक्तव्याच्या आधारावर शनिवारी माध्यमांमध्ये एक बातमी वेगाने पसरली. रिझर्व्ह बँक लवकरच 100, 10 आणि 5 रुपयांच्या जुन्या नोटा चलनातून बाहेर करण्याचा निर्णय घेणार असल्याची ही बातमी आहे. माध्यमांमध्ये पसरलेल्या या बातमीवर आता रिझर्व्ह बँकेने एक स्पष्टीकरण दिले आहे. असा कुठलाही निर्णय घेतला गेला नाही, असे रिझर्व्ह बँकेकडून सांगण्यात आले आहे. पीआयबीने त्याबाबत एक ट्विट केले आहे.

रिझर्व्ह बँकेने सांगितले की 100, 10 आणि 5 रुपयांच्या सर्व नोटा वैध आहेत आणि ते चलनात कायम राहतील. सध्या या नोटा चलनातून बाहेर करण्याचा सरकारचा कुठलाही विचार नाही. त्यामुळे मार्च आणि एप्रिलनंतरही 5, 10 आणि 100 रुपयांच्या जुन्या नोटाही बाजारात सुरू राहतील. दरम्यान आरबीआयकडून 5, 10 आणि 100 रुपयांच्या नव्या नोटा जारी करण्यात आल्या आहेत. बाजारात सध्या नव्या आणि जुन्या नोटा चालू आहेत.



## खारघरमध्ये तरुणावर त्रिकुटाचा गोळीबार



पेण येथून नवी मुंबईत मित्राला भेटण्यासाठी आलेल्या प्रतिक रवींद्र आहेर (२४) या तरुणावर अज्ञात त्रिकुटाने रिव्हॉल्वरने गोळीबार करून पलायन केल्याची घटना शनिवारी रात्री खारघरमध्ये घडली. या गोळीबारात प्रतिक जखमी झाला असून त्याच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. हा प्रकार लुटमारीच्या उद्देशाने घडल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे. त्यानुसार खारघर पोलिसांनी अज्ञात त्रिकुटावर गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे. या घटनेतील जखमी प्रतिक आहेर हा पेण शहरात राहण्यास असून त्याचा इस्टेट एजंटचा व्यवसाय आहे. शनिवारी दुपारी ३च्या सुमारास तो पेण येथून मोटारसायकलवरून नवी मुंबईत मित्राला भेटण्यासाठी आला होता. त्यानंतर रात्री १०च्या सुमारासवाशी येथून सायन-पनवेल महामार्गाने पनवेलच्या दिशेने जात होता. खारघर येथील कोपरी गाव बस थांब्यानजीक तो सिगारेट ओढण्यासाठी थांबला असता तीन अज्ञात व्यक्तींनी त्याच्याकडे मोबाइल, पैसे व मोटरसायकलच्या चावीची मागणी केली. मात्र, प्रतिकने नकार दिल्याने त्रिकुटापैकी एकाने त्याच्या डाव्या पायाच्या मांडीवर एक गोळी झाडली. त्यानंतर तिघांनी त्या ठिकाणावरून पलायन केले. एका नागरिकाने याबाबत कळविल्यानंतर खारघर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन जखमी प्रतिकला खासगी रुग्णालयात दाखल केले आहे. लुटमारीच्या उद्देशाने हा गोळीबार करण्यात आला असल्याची शक्यता परिमंडळ-१चे पोलिस उपायुक्त सुरेश मेंगडे यांनी व्यक्त केली. तसेच आरोपींचा शोध घेण्यासाठी गुन्हे शाखा व पोलिस ठाण्याचे पथक रवाना करण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

## चाकूने भोसकणाऱ्या दोन आरोपींना अटक



भावसिंगपुऱ्याकडे जाण्यासाठी दुचाकीला लिफ्ट मागत असताना धक्का लागल्याच्या कारणावरून जेष्ठ नागरिकाच्या पोटात चाकुने भोसकून गंभीर जखमी करणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेने शनिवारी (२३ जानेवारी) रात्री अटक केली. शेख बशीर शेख वजीर (२१, रा. मुजीब कॉलनी, कटकट गेट) व शेख इम्रान शेख वजीर (२०, रा. दानीश पार्क, नारेगाव) अशी आरोपींची नावे असून, त्यांना गुरुवारपर्यंत (२८ जानेवारी) पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी ए. एस. कांबळे यांनी रविवारी (२४ जानेवारी) दिले. भावसिंगपुरा भागातील नारायण कचरू गवई (५३, रा. भीमनगर) हे २१ जानेवारी रोजी रात्री साडेदहाच्या सुमारास मिल कॉर्नरहून घरी जाण्यासाठी वाहन शोधत होते. त्यावेळी तेथून जाणाऱ्या एका दुचाकीस्वाराला त्यांनी लिफ्ट मागण्यासाठी हात दाखवला, मात्र, तेवढ्यातच तेथून दुचाकीवर (क्रमांक एमएच २० एफक्यू ३०७) जात असलेल्या शेख बशीर व शेख इम्रानला गवई यांच्या हाताचा धक्का लागला. या कारणावरुन दोघांनी गवई यांच्याशी वाद घालून त्यांच्या पोटात चाकूने वार केले. या घटनेनंतर दोन्ही हल्लेखोरांनी पडेगावच्या कासंबरी दर्ग्याकडे धूम ठोकली.

याप्रकरणी क्रांतीचौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल होताच गुन्हे शाखेने सीसीटीव्ही चित्रीकरणाच्या आधारे आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक केली.

## लग्नाच्या आदल्या दिवशी भावानं बहिणीला घातल्या गोळ्या, धक्कादायक कारण उघड



मेरठ: उत्तर प्रदेशच्या मेरठ जिल्ह्यात लग्नाच्या आदल्या दिवशीच भावाने आपल्या बहिणीची गोळ्या घालून हत्या केली. या घटनेमागील कारण उघड झाल्यानंतर सर्वांना धक्का बसला. पोलिसांनी तरुणाला अटक केली आहे.

इस्लामाबाद येथील १९ वर्षीय तरुणीची शनिवारी सकाळी तिच्या भावाने गोळ्या घालून हत्या केली. रविवारी या तरुणीचे लग्न होते. लग्नाच्या आदल्या दिवशी बहिणीची भावाने हत्या केली. त्यानंतर त्याने स्वतःला पोलिसांच्या हवाली केले. चौकशीदरम्यान त्याने पोलिसांना धक्कादायक माहिती दिली. बहिणीचे तिच्या दोन मोठ्या बहिणीचा दीर कासिम याच्यासोबत प्रेमसंबंध होते. गेल्या चार वर्षांपासून त्यांचे प्रेमसंबंध होते. घरच्यांचा विरोध असूनही ते दोघे एकमेकांना भेटायचे. बहिणीचं लग्न ठरल्याचे समजताच, तो संतापला. कासिम याने त्याच्या मोबाइलवर बहिणीचे अश्लील फोटो पाठवले. ते फोटो पाहून राग अनावर झाला आणि त्याने बहिणीची हत्या केली, असे त्याने सांगितले.

पोलीस कोठडीत असलेल्या आरोपीच्या चेहऱ्यावर जरासुद्धा पश्चाताप दिसून येत नव्हता. त्याने सांगितले की, काही दिवसांपूर्वी बहीण आपला प्रियकर कासिमसोबत पळून गेली होती. तिची कशीबशी समजूत काढली आणि तिला परत आणले होते. या घटनेनंतर कुटुंबाची बदनामी झाली होती. त्यानंतर बहिणीचं लग्न ठरले होते. मात्र, कासिम ते लग्न मोडण्याचे प्रयत्न करत होता. तो वारंवार तिचे अश्लील फोटो मोबाइलवर पाठवत होता, असे त्याने सांगितले.

लग्नानंतर कासिम त्याच्या बहिणीच्या पतीला हे फोटो पाठवेल, अशी भीती आरोपीला होती. त्यामुळे बहिणीचा संसार उद्ध्वस्त झाला असता. तसेच समाजात बदनामी झाली असती, असेही त्याला वाटत होते.

त्यामुळे त्याने बहिणीची गोळ्या घालून हत्या केली. दरम्यान, आरोपीला अटक करून त्याची रवानगी कोठडीत करण्यात आली आहे.

## शेजारी राहणाऱ्या मुलीच्या पोटातील बाळाचा पिता 'तो' नाही सिद्ध झालं आणि...



शेजारी राहणाऱ्या मुलीवर बलात्कार करुन तिला गर्भवती केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आलेल्या हॉटेल कर्मचाऱ्याला अखेर जामीन मंजूर झाला आहे.

पीडित मुलीच्या पोटातील बाळाचा पिता आरोपी नसल्याचे डीएनए चाचणीतून स्पष्ट झाल्यानंतर न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला. २५ वर्षीय आरोपी १७ महिने तुरुंगात होता. मुलीच्या पोटातील बाळ आरोपीचे नाही, हे डीएनए चाचणीतून सिद्ध झाल्यानंतर त्याला जामीन मिळाला. डीएनएच चाचणीचा अहवाल आणि दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकून घेतल्यानंतर, न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला. पीडित मुलगी विशेष मुलांच्या शाळेत शिकते.

२३ जुलै २०१९ रोजी शाळेत असताना तिने पोटात दुखत असल्याची तक्रार केली, कुटुंबीय मुलीला रुग्णालयात घेऊन गेले, तिथे ती गर्भवती असल्याचे समजले. मुलीला जेव्हा, याबद्दल घरच्यांनी विचारले, तेव्हा तिने शेजाऱ्याने आपल्यावर दोन वेळा बलात्कार केल्याचे सांगितले.

मुंबई पोलिसांनी या प्रकरणी तपास करुन आरोपपत्र दाखल केले. आरोपीने याआधी सुद्धा जामिनासाठी अर्ज दाखल केला होता.


### मिरा भाईंदर महानगरपालिका
**प्रभाग कार्यालय क्र.१**

**जा.क्र. मनपा/प्र.का.क्र.१/सी५८७/४९०३/२०२०-२१ दिनांक :-१९/०१/२०२१**

**// नोटीस //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र.१ क्षेत्रातील क्षेत्रफल १२०, सदनिका ०१, झोन क्र.१ येथील मालमत्ता क्रमांक **सी०१००३३६९४०००** असून **जय अंबे नगर नं.१,** या इमारतीस २००३-०४ मध्ये **जमीला महमद शेख** या नावाची नोंद महानगरपालिका दफ्तरी नोंद आहे. तरी वारस **मुलगा** या नात्याने **नूरमोहमद युसुफ शेख** यांनी दिनांक: ०५/१०/२०१८ रोजी लेखी अर्ज करून सदरची मालमत्ता हस्तांतरण करणेकरीता मागणी केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार नावात बदल करणेबाबत प्रसिध्दी देण्यात येत आहे.

सदर मिळकती बाबतचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस - गोल्डस्टार बेकरी
पश्चिमेस - विनोद चव्हाण यांचे घर
दक्षिणेस - मनपा रस्ता
उत्तरेस - राजकुमार पाल

वरील मालमत्ता हस्तांतरणाबाबत कुणाचीही तक्रार व हरकत करावयाची झाल्यास **१४** दिवसांचे आत प्रभाग कार्यालय क्र. **१** येथे कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह कागदपत्र दाखल करावे मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

सही/-
प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र.१
मिरा भाईंदर महानगरपालिका

### मिरा भाईंदर महानगरपालिका
**प्रभाग कार्यालय क्र.१**

**जा.क्र. मनपा/प्र.का.क्र.१/सी१२/१६४१/२०२०-२१ दिनांक :-२२/१२/२०२०**

**// नोटीस //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र.१ क्षेत्रातील क्षेत्रफल १२०, सदनिका.., झोन क्र.१वार्ड सी येथील मालमत्ता क्रमांक **सी०१०००५६५५०००** असून **जय अंबे नगर नं.२,** या इमारतीस २००३-०४ मध्ये **श्यामकिशोर जी. यादव** या नावाची नोंद महानगरपालिका दफ्तरी नोंद आहे. तरी वारस **पत्नी** या नात्याने **श्रीम. नगीनादेवी श्यामकिशोर यादव** यांनी दिनांक: १७/०३/२०२० रोजी लेखी अर्ज करून सदरची मालमत्ता हस्तांतरण करणेकरीता मागणी केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार नावात बदल करणेबाबत प्रसिध्दी देण्यात येत आहे.

सदर मिळकती बाबतचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस - मनपा रस्ता
पश्चिमेस - सुबेदार कनौजिया
दक्षिणेस - श्यामलाल यादव
उत्तरेस - राजाराम गुप्ता

वरील मालमत्ता हस्तांतरणाबाबत कुणाचीही तक्रार व हरकत करावयाची झाल्यास **१४** दिवसांचे आत प्रभाग कार्यालय क्र. **१** येथे कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह कागदपत्र दाखल करावे मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

सही/-
प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र.१
मिरा भाईंदर महानगरपालिका

### मिरा भाईंदर महानगरपालिका
**प्रभाग कार्यालय क्र.१**

**जा.क्र. मनपा/प्र.का.क्र.१/सी३२/४९०४/२०२०-२१ दिनांक :-१९/०१/२०२१**

**// नोटीस //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र.१ क्षेत्रातील क्षेत्रफल १७६, सदनिका.. , झोन क्र.०१ येथील मालमत्ता क्रमांक **सी०१००००३०१०००** असून **गणेश आनंद नगर,** या इमारतीस २००३-०४ मध्ये **भोलानाथ सरोज** या नावाची नोंद महानगरपालिका दफ्तरी नोंद आहे. तरी वारस **पत्नी** या नात्याने **श्रीम. निर्मलादेवी भोलानाथ सरोज** यांनी दिनांक: ०७/०१/२०२१ रोजी लेखी अर्ज करून सदरची मालमत्ता हस्तांतरण करणेकरीता मागणी केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार नावात बदल करणेबाबत प्रसिध्दी देण्यात येत आहे.

सदर मिळकती बाबतचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस - मनपा रस्ता (गल्ली)
पश्चिमेस - मनपा रस्ता (गल्ली)
दक्षिणेस - वियय रामकिशन शाहु
उत्तरेस - छोटेलाल शर्मा

वरील मालमत्ता हस्तांतरणाबाबत कुणाचीही तक्रार व हरकत करावयाची झाल्यास **१४** दिवसांचे आत प्रभाग कार्यालय क्र. **१** येथे कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह कागदपत्र दाखल करावे मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

सही/-
प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र.१
मिरा भाईंदर महानगरपालिका



## पृष्ठ १ वरुन


### पोलिसांसाठी एक लाख घरे बांधणार

महासंचालक शिबीर कार्यालयासह पाचपावली आणि इंदोरा येथील पोलीस अमलदारांचे शासकीय निवासस्थानाचे उद्घाटन केले. यावेळी गृहमंत्री अनिल देशमुख यांनी ही महत्वपूर्ण घोषणा केली.

राज्यात पोलिसांसाठी घरे कमी आहेत. त्यामुळे ती बांधण्यासाठी आम्ही प्रयत्न सुरू केले आहेत. एखादा बिल्डर आपल्या जागेवर पोलिसांसाठी घर बांधून देत असेल, तर त्याला 4 एफएसआय आणि इतर सुविधा देण्याचा विचार सुरू आहे. ही सर्व घरे पोलीस हाऊसिंग कॉर्पोरेशनच्या नावानेच बांधली जाणार आहेत. जवळपास एक लाख घरे महाराष्ट्र पोलिसांसाठी बांधण्याची तयारी आम्ही केली आहे, असे अनिल देशमुख म्हणाले.

कोरोनामुळे राज्य शासनाच्या भरवशावर राहून घरे बांधली जाऊ शकणार नाही. त्यासाठी वेगवेगळ्या पद्धती वापरुन पोलीस विभागातूनच घरे बांधली जातील, असेही अनिल देशमुख म्हणाले. येत्या 26 तारखेपासून जेल टुरिझमला सुरुवात होईल. येरवडा जेलसोबत महात्मा गांधींच्या आठवणी आहे. येरवडानंतर इतर जेलमध्ये सुद्धा हे करण्यात येणार आहे. जेल कसे असते याची उत्सुकता नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना असते. त्यामुळे हे सुरु करण्यात येत आहे, असेही अनिल देशमुख यांनी सांगितले.

मुंबईत 5 सायबर पोलीस स्टेशन सुरू करणार

सायबर क्राईम हा विषय महत्वाचा आहे. त्याचे प्रमाण वाढत आहे. यामुळे गुन्हे वाढले. यावर कसे नियंत्रण आणायचे यासाठी सायबर क्राईमवर काम करायचे आहे. याच पार्श्वभूमीवर मुंबईत 5 सायबर पोलीस स्टेशन सुरू करण्यात येणार आहेत. सायबर क्राईम वाढण्याचे प्रमाण खूप मोठे आहे.

### कोणाला किती मुलं होती मी

मागे घेण्यात आला असला तरी, विरोधकांनी हा मुद्दा चांगलाच लावून धरला आहे. धनंजय मुंडेवर विरोधक टीका करत आहेत. धनंजय मुंडेंच्या प्रकरणात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विरोधकांचा समाचार घेताना चांगल्याच कानपिचक्या दिल्या आहेत. मागील काळात कुणी काय लपवाछपवी केले हे सांगू का? असा इशारा अजित पवार यांनी दिला आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धनंजय मुंडें प्रकरणावर प्रतिक्रिया दिली आहे. अजित पवार म्हणाले की, धनंजय मुंडे यांनी प्रकरणावर आपले स्पष्टीकर दिले आहे. परंतु तरीही विरोधक टीकेचे बाण सोडत आहेत. विरोधकांनी टीका कऱणे हे त्यांचे काम आहे. परंतु कोणत्या पातळीपर्यंत मर्यादीत असावी यालाही मर्यादा आहे. असे म्हणत मागील काळात कुणी किती लपवाछपवी केली आहे. हे मी सांगू का असा धमकीवजा इशाराच अजित पवार यांनी दिला आहे. कोणाला किती मुले आहेत? तसेच कोणाचे लग्न झाले होते की नव्हते झाले हेही सांगू का? अशा कितीतरी गोष्टी मला माहीत आहे. त्या सांगितल्या पाहिजेत का असा प्रश्नही अजित पवार यांनी केला आहे.

जतीनिहाय जनगणना करण्याची मागणी जुनी असून मागच्या लोकसभेच याबाबत मागणी करण्यात आली होती. गेले अनेक वर्षांपासून ही मागणी केली आहे. तसेच जातीनिहाय जनगणना करायचे की, नाही हा निर्णय केंद्र सरकारचा आहे. तसेच हा लोकसभेचा अधिकार आहे. जातीनिहाय जणगणना करण्याची मागणी अजित पवार यांनी केली आहे. केंद्राने जनतेच्या मागण्यांवर लक्ष द्यायला हवे असेही अजित पवार यांनी म्हटले आहे.

### सर्वांसाठी लोकल लवकरच!

दूरच्या प्रवाशांची होतेय कुचंबणा गेल्या दहा महिन्यांपासून राज्यात करोनाने थैमान घातले आहे. मार्च महिन्यात लॉकडाऊन लागू करण्यात आले होते. तेव्हापासूनच मुंबईतील उनपनगरीय लोकलसेवा बंद करण्यात आली. नंतर राज्य सरकारच्या विनंतीवरून सर्वप्रथम अत्यावश्यक सेवेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी विशेष लोकलसेवा सुरू करण्यास रेल्वे मंत्रालयाने परवानगी दिली. यात पुढे लोकलच्या फेऱ्यांचे प्रमाण टप्प्याटप्प्याने वाढवण्यात आले. त्यासोबतच सेवाविस्तार करत सहकारी व खासगी बँकांतील कर्मचाऱ्यांना काही प्रमाणात लोकल प्रवासाची मुभा दिली गेली. नंतर त्यात महिला प्रवाशांसाठी लोकलचे दार उघडले. वकील, खासगी सुरक्षा रक्षकांनाही लोकलने प्रवासाची परवानगी आहे. यात सर्वसामान्य प्रवाशांना मात्र आजही लोकलपासून दूरच राहावे लागले आहे. विशेषत: दूरच्या उपनगरांतून मुंबईत दररोज कामानिमित्त येजा करणाऱ्या प्रवाशांची फारच कुचंबणा होत आहे. प्रवासातच त्यांना चार ते पाच तास खर्ची घालावे लागत आहेत. त्याचा आर्थिक भुर्दंडही मोठा आहे. त्यामुळेच सर्वांसाठी लोकल कधी सुरू होणार, याची प्रतीक्षा या सर्वांनाच आहे. या पार्श्वभूमीवर आज झालेली बैठक आशेचा किरण घेऊन आल्याचेच संकेत मिळत आहेत.

### 32 वे रस्ता सुरक्षा अभियान

अभियान हे दिनांक १८/०१/२०२१ ते दिनांक. १७/०२/२०२१ या कालावधीत राबविण्यात येत आहे. सदर कालावधीत वाहन चालकांमध्ये वाहतूक नियमांबाबत जागृत करण्यात येणार आहे. वाहतुकीचे नियमांचे उल्लंघन केल्यास होणारे अपघात यामुळे वाहन चालक त्याच बरोबर त्यांचे कुटुंबीयांची होणारी आतोनात हानी याबाबत तसेच हेल्मेट, सीटबेल्ट चा वापर करणे, सिग्नल जम्पिंग, ट्रिपल सीट, अवैध प्रवासी वाहतूक टाळणे,वाहन चालविताना वेगाची मर्यादा पाळणे, मद्याचे अंमलाखाली असताना वाहन चालविणे टाळावे या व इतर वाहतुकीचे नियमांबाबत जनजागृती करून विशेषत शाळा/ कॉलेज चे विद्यार्थी यांना प्रबोधन करण्यात येत आहे. बॅनर/ पोस्टर/ परिपत्रक/ केबल नेटवर्क/ पथनाट्य वर्तमान पत्रांचे आधारे जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचून रस्ता वाहतुकीचे नियमांचे पालन व अपघातांचे प्रमाण कसे कमी होईल याबाबत प्रयत्न करीत आहेत. सदरचे रस्ता सुरक्षा अभियान यशस्वी होण्याकरिता नागरिकांचे सह कार्यही तेवढेच मोलाचे आहे.

### शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ उतरले फॅशन

वाहनांमधून मोर्चेकरी मुंबईकडे रवाना झाले. ठाणे शहर व मुंबईत मोर्चाचे स्वागत करण्यात आले. सायंकाळी वाहनांमधून मोर्चेकरी आझाद मैदानात दाखल झाले. हे मोर्चेकरी आझाद मैदानात दाखल झाल्यापासून त्यांना सर्वच स्तरांमधून पाठिंबा दिला जात आहे.

पालिकेकडून मोर्चेकऱ्यांना मदत

र्चासाठी रविवारी संध्याकाळपासूनच शेतकरी मोठय़ा संख्येने मुंबईत दाखल होण्यास सुरुवात झाली. परिणामी, आझाद मैदान परिसरात मोर्चेकऱ्यांची प्रचंड गर्दी झाली होती. मोर्चा लक्षात घेऊन पालिकेने स्वच्छतेसाठी सफाई कामगार, पिण्यासाठी पाणी आणि फिरत्या शौचालयांची व्यवस्था केली. त्याचबरोबर करोनाचा संसर्ग लक्षात घेऊन मोर्चेकरी शेतकऱ्यांना मुखपट्टी आणि सॅनिटायझरचे वाटपही सुरू केले. मोर्चामुळे होणारी गर्दी लक्षात घेऊन करोनाचा संसर्ग वाढू नये म्हणून पालिकेने आझाद मैदान परिसरात वैद्यकीय शिबिराची व्यवस्था करण्यात आली असून डॉक्टर आणि परिचारिकांचे एक पथक तेथे तैनात करण्यात आले आहे. गरज भासल्यास करोना चाचणीही करण्यात येत आहे, असे 'ए' विभाग कार्यालयातील साहाय्यक आयुक्त चंदा जाधव यांनी सांगितले.

कडेकोट बंदोबस्त आणि वाहतुकीतील बदल

संयुक्त शेतकरी कामगार मोर्चाच्या वतीने सोमवारी मुंबईत होणाऱ्या आंदोलनात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी कडेकोट बंदोबस्त ठेवला आहे. वाहतूक कोंडीचा प्रश्न उद्भवू नये यासाठी मुंबई पोलिसांनी आझाद मैदानाभोवती सुमारे शंभर अधिकारी आणि ५०० अंमलदारांचा फौजफाटा तैनात केला आहे. याशिवाय राज्य राखीव पोलीस दलाच्या नऊ तुकडय़ा या बंदोबस्तात असतील. ड्रोनद्वारे या संपूर्ण आंदोलनावर लक्ष ठेवले जाईल, असे पोलीस प्रवक्ते चैतन्य एस. यांनी स्पष्ट के ले.

## १००, १०, ५ रुपयांबद्दल आरबीआयचे स्पष्टीकरण

बाजारात सर्व नव्या नोटा उपलब्ध

नोटबंदीनंतर रिझर्व्ह बँकेकडून 2000, 500, 200, 100, 50, 20, 10 आणि 5 रुपयांच्या नव्या नोटा जारी करण्यात आल्या आहेत. दरम्यान, आताही जुन्या नोटा वैध आहेत आणि त्या चलनातही आहेत. रिझर्व्ह बँकेकडून 5 जानेवारी 2018 ला 10 ची नोट जारी करण्यात आली होती. जुलै 2019 मध्ये 100ची नवी नोट जारी करण्यात आली होती. त्याचबरोबर 20 रुपयांची नवी नोटही चलनात आणली. तर 50 ची नवी नोट 18 ऑगस्ट 2017 ला जारी करण्यात आली होती. 25 ऑगस्ट 2017 ला 200 रुपयांची नवी नोट जारी करण्यात आली होती. नोटबंदीनंतर लगेच 10 नोव्हेंबर 2016 ला 500 रुपयांची नोट जारी करण्यात आली होती. त्याच दिवशी 2000 रुपयांची नोटही जारी करण्यात आली होती.

## संपादकीय...



# उशिरा का होईना, केंद्र सरकारला शहाणपण सुचले

राजधानी दिल्लीच्या सीमेवर चालू असलेल्या शेतकरी आंदोलनाविषयी केंद्र सरकारला चर्चेच्या दहाव्या फेरीनंतर का असेना शहाणपणा सुचला आहे, असे म्हणायला हरकत नाही. देशातील पन्नास टक्क्याहून अधिक जनता ज्या शेती व्यवसायावर अवलंबून आहे, त्या क्षेत्रात आमुलाग्र बदल करताना चर्चा घडवून आणावी, सहमती घडविण्याचा प्रयत्न करावा, असे सरकारला वाटलेच नाही. कृषि क्षेत्राविषयीच्या तीन वादग्रस्त कायद्यांबद्दल असे घडले आहे.

चर्चेच्या पहिल्या किंवा दुसऱ्या फेरी अखेरीस आंदोलनकर्त्या शेतकऱ्यांचे मुद्दे विचारात घेण्याजोगे आहेत, असे वाटले असते तर कायद्यांना स्थगिती देवून एक व्यापक अभ्यास समिती नेमून सार्वत्रिक चर्चा घडवून आणता आली असती. हे सरकारने केले नाही याचे आश्चर्य वाटते. आता स्थागिती देणे आणि समिती नेमणे हा प्रकार म्हणजे उशिरा सुचलेले शहाणपण आहे.

केंद्र सरकारने गेल्या सप्टेंबरमध्ये संसदेतच संमत करून घेतलेले तिन्ही वादग्रस्त कृषी कायदे रद्द



करण्याच्या मागणीसाठी पंजाब, हरयाना, उत्तर प्रदेश, आदी राज्यांतील हजारो शेतकऱ्यांनी राजधानी दिल्लीच्या सीमेवर गेले दोन महिने प्रचंड थंडीची पर्वा न करता धरणे आंदोलन चालू ठेवले आहे.

येत्या प्रजासत्ताक दिनी राजपथावरील अधिकृत शासकीय पथसंचलनानंतर ट्रॅक्टर-ट्रॉलीसह रॅली काढण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. त्यासाठी उत्तरेतील अनेक राज्यांतील शेतकरी दररोज या धरणे आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत. दरम्यान, तिन्ही वादग्रस्त कायदे रद्द करण्याच्या मागणीवर ठाम असणाऱ्या शेतकऱ्यांशी केंद्रीय कृषिमंत्री नरेंद्रसिंग तोमर यांच्या अध्यक्षतेखालील मंत्रिगटाबरोबर सुमारे चाळीस शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाच्या चर्चेच्या दहा फेऱ्या पूर्ण झाल्या आहेत.

शेतकऱ्यांनी चर्चेत भाग घेताना आपल्या मागण्यांवर तसूभरही माघार घेतलेली नाही. तिन्ही कायदे मागे घ्या, रद्द करा आणि शेतमालाला किमान आधारभूत भाव देण्याची सक्ती करणारा कायदा करा, अशी मागणी ठामपणे लावून धरली आहे. केंद्र सरकारने चर्चेच्या एक-दोन फेऱ्या झाल्यानंतर कायद्यात बदल सुचविल्यास विचार करण्याची तयारी दर्शविली.

ती पण शेतकऱ्यांच्या संघटनेने नाकारली. कायदेच रद्द करा ही मागणी लावून धरली आहे.मध्यंतरीच्या काळात एका वकील महाशयाने दिल्लीला जोडणारे रस्ते अडवून नागरिकांची गैरसोय करता येणार नाही, शेतकऱ्यांना रस्त्यावरून हटविण्यात यावे, अशी मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली.

या याचिकेवर सुनावणी करताना तसेच निकाल देताना वादग्रस्त कायद्यात बदल सुचविण्यासाठी तसेच अभ्यास करण्यासाठी समिती नियुक्त करण्यात आली. तसेच या तिन्ही कायद्यांना स्थगिती देण्यात आली.

या समितीवर तिन्ही कायद्यांचे समर्थन करणारेच चारही सदस्य नियुक्त केल्याची टीका-टिप्पणी झाली. चारपैकी एका सदस्याने (भुपिंदरसिंग मान) शेतकऱ्यांबरोबर राहण्याचा निर्णय घेऊन समितीवर काम करण्यास असमर्थता दाखविली आहे.चर्चेच्या दहाव्या फेरीत केंद्र सरकारतर्फे मंत्रिगटाने हे कायदे दोन वर्षे स्थगित करून एक समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. हा प्रस्तावही शेतकऱ्यांनी फेटाळला आहे. वास्तविक हाच मार्ग अगोदर स्वीकारला असता तर शेतकऱ्यांनी कदाचित आंदोलन मागे घेतले असते.

सर्व तिन्ही कायदे स्थगित ठेवले आणि त्यातील वादग्रस्त मुद्यांवर देशव्यापी चर्चा आणि समितीकडून विचारविनिमय करण्यात येऊन आवश्यक बदल स्वीकारले गेले तर शेतकऱ्यांचा गैरसमज दूर होईल असे वाटत होते; पण तसे झाले नाही. आता कायदे स्थगित ठेवण्याचा प्रस्तावही शेतकरी आंदोलकांनी फेटाळल्याने हा पेच आणखी वाढला आहे.

कायदे स्थगित ठेवून त्यावर संसदेत आणि देशभरात खुली चर्चा घडवून आणल्यानंतरच त्यात दुरुस्ती करायची की रद्दच करायचे याबाबतचा निर्णय घेता आला असता. मात्र शेतकरी आंदोलकांनी कोणत्याही परिस्थितीत वादग्रस्त कृषी कायदे रद्द झालेच पाहिजेत अशी घेतलेली भूमिका सरकारला एकतर बिनशर्थ माघार घ्यायला लावणारीच आहे. सरकार तशी माघार घेते की आणखी काही पर्याय सुचवून शेतकऱ्यांची समजूत काढते हे येत्या काही दिवसत कळेलच

# कंपनी सरकार!

**फेसबुक, गूगल आदी अजस्र कंपन्यांना आवरायचे कसे, याबाबत भारत चाचपडत असताना फ्रान्स, स्पेन आणि ऑस्ट्रेलिया या देशांनी या कंपन्यांना वेसण घातली आहे..**

जवळपास साडेपाच लाख भारतीयांची माहिती फेसबुकवरून ‘उचलल्या’च्या आरोपावरून ‘केम्ब्रिज ॲनालिटिका’विरोधात आपल्या केंद्रीय अन्वेषण विभागाने गुन्हा दाखल केला. हे म्हणजे बाजार उठल्यावर पिशवी घेऊन मंडईत जाण्यासारखे. या ‘केम्ब्रिज’ने ब्रेग्झिट आणि अमेरिकी निवडणुकांत घातलेल्या हैदोसाच्या कहाण्या जगभर समोर येत होत्या तेव्हा आपल्या सरकारने हातपाय हलवल्याची नोंद नाही. आता ही कंपनी बाराच्या भावात गेल्यानंतर आपल्या सरकारी यंत्रणा तिच्याविरोधात चौकशी करू इच्छितात. म्हणून हा गुन्हा. ही घटना विनोदी की केविलवाणी हा चर्चेचा विषय तूर्त बाजूस ठेवला तरी, यावरून आपल्या सरकारचे माहिती तंत्रज्ञान क्षेत्राबाबतच्या धोरणांतील ढिसाळपण ठसठशीतपणे दिसते. याआधी व्हॉट्सॲपच्या नव्या माहिती गुप्ततेच्या धोरणाबाबत आपल्या सरकारने या कंपनीस खडसावले. निदान तसा प्रयत्न केला. वास्तविक भाजप आणि समर्थकांच्या प्रियतम अर्णब गोस्वामी याची व्हॉट्सॲपवरील विचारमौक्तिके आणि विचारविलसिते नक्की फुटली कशी याची यानिमित्ताने चौकशी करण्याची संधी सरकारला होती. पण त्याबाबत सरकार काही उत्सुक असल्याचे दिसत नाही. त्यापेक्षा इतरांच्या माहितीची गुप्तता वगैरे मुद्द्यांवरून दरडावल्यासारखे करणे अधिक सोपे. यातून जगातील या अतिबलाढ्य कंपन्यांना नक्की हाताळायचे कसे याबाबत आपण किती चाचपडत आहोत, याचे दर्शन घडते. युरोप असो वा अमेरिका; सध्या सर्वत्र चर्चा आहे ती फेसबुक, गूगल आदी अजस्र कंपन्यांना आवरायचे कसे, याची. आपल्याकडे याबाबत सध्या आनंद असला तरी फ्रान्स, स्पेन आणि ऑस्ट्रेलिया या देशांनी या कंपन्यांना कशी वेसण घातली हे समजून घेणे उद्बोधक ठरेल.गूगलच्या माध्यमातून फुकट वृत्तप्रसार हा आता अनेकांच्या सवयीचा झाला आहे. यात गूगलचे कर्तृत्व शून्य. अन्य नामांकित वृत्तमाध्यमे आपल्या पदरास खार लावून पत्रकारिता करीत असतात. त्यांच्या वृत्तांचे एकत्र संकलन म्हणजे गूगलचा हा उद्योग. त्यामुळे सदर वृत्तांचा प्रसार होण्यास मदत होते हे खरे. पण तो प्रसार होत असताना गूगलच्या फलाटाचा वापर होत असतो. त्यांची दृश्यमानता वाढत असते. त्याचा आधार घेत गूगल जाहिराती घेते आणि मधल्या मधे त्या कंपनीची धन होते. यातून गूगलच्या हाती पडणारे उत्पन्न कल्पनातीत आहे. हे सर्व सुरुवातीस खपून गेले. पण नव्याची नवलाई संपल्यावर सर्वांनाच गूगलच्या या फुकाच्या कमाईची जाणीव झाली. त्यातून वृत्तसेवा वापरल्याबद्दल गूगलने संबंधित प्रकाशनांस आपल्या महसुलाचा वाटा द्यायला हवा, अशी मागणी पुढे आली. गूगल, फेसबुक यांसारख्या कंपन्या ‘टू बिग टु फेल’ अशा आकाराच्या झाल्या. म्हणजे या कंपन्यांचे ‘कोसळणे’ अन्यांच्या पोटावर पाय आणणारे असेल अशी परिस्थिती. तेव्हा आपल्या या जगड्व्याळ आकाराचा फायदा घेत या कंपन्यांनी माहिती महाजालात आपली मक्तेदारी निर्माण केली. यातूनच अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना समाजमाध्यमांतून बेदखल करण्याइतके औद्धत्य या कंपन्या दाखवू शकतात. अर्थात, ट्रम्प किती नतद्रष्ट होते हे नव्याने सांगण्याची गरज नाही. पण म्हणून त्यांचा व्यक्त होण्याचा अधिकारच नाकारणे हे या कंपन्यांकडूनही जरा अतिच झाले. ट्रम्प यांचा नालायकपणा इतका की, या कंपन्यांची ही अरेरावी खपूनही गेली. पण यानिमित्ताने या कंपन्यांचा मुजोरपणा समोर आला. त्यास आळा घालता येईल न येईल; पण निदान त्यांना आव्हान कसे द्यायचे हे ऑस्ट्रेलिया, फ्रान्स आदी देशांनी दाखवून दिले आहे. आपल्याकडेही या कंपन्यांचा उच्छाद सुरू आहेच. पण या देशांनी जे काही केले तसे काही करून दाखवण्याची आपली तूर्त तरी शामत नाही. म्हणून हे समजून घेणे आवश्यक ठरते.यातील ताजे प्रकरण आहे ते ऑस्ट्रेलियाचे. या देशाच्या पार्लमेंटने ऑस्ट्रेलियातील वृत्तमाध्यमांच्या बातम्या ‘वापरल्या’ गेल्यास ऑस्ट्रेलियाच्या माध्यमांना गूगलने स्वामित्व शुल्क देणे बंधनकारक करू पाहणारा एक कायदा आणला आहे. गूगलप्रमाणेच या बातम्यांचा संक्षिप्त अंश फेसबुकवरही प्रकाशित केला जातो. नवा नियम त्यामुळे फेसबुकलाही लागू होतो. गूगल आणि फेसबुक यांची ही सेवा अत्यंत लोकप्रिय आहे. कारण एकाच ठिकाणी देशातील सर्व वृत्तमाध्यमांतून आवश्यक तो वृत्तपुरवठा येथे होतो. पण त्यातून




माध्यमांचे नुकसान होते. कारण त्यांनी स्वकष्टाने प्रसृत केलेला मजकूर गूगल, फेसबुक यांना मोफत मिळतो. वर ते पाहणारे खूप आहेत म्हणून जाहिरातीही मिळतात. याचा विचार करून म्हणूनच ऑस्ट्रेलियी सरकारने सदर निर्णय घेतला. साहजिकच या दोन कंपन्या त्यामुळे चवताळल्या. त्यातूनच गूगलने त्या देशात आपली ‘सर्चइंजिन’ची सेवा बंद करण्याची धमकी दिली, तर फेसबुकने ऑस्ट्रेलियी नागरिकांना काहीही ‘पोस्ट’ करू देणार नाही, असा इशारा दिला. एखाद्या सार्वभौम सरकारला एखादी कंपनी कशी क:पदार्थ लेखू शकते याचा हा नमुना. याआधी फ्रान्स सरकारनेदेखील अशीच भूमिका घेतली आणि गूगलला ती मान्य करायला लावली. स्पेनसारखा लहानखुरा देशदेखील या कंपन्यांविरोधात काहीएक निश्चित भूमिका घेताना दिसतो.यानंतर लक्षात घ्यावी अशी बाब म्हणजे, ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधान स्कॉट मॉरिसन यांची खणखणीत भूमिका. त्यांनी यावर भाष्य करताना ना गूगलचे नाव घेतले ना ‘आम्ही धमक्यांना भीक घालत नाही’ अशी फिल्मी भाषा केली. तेम्हणाले :

‘‘सरकारचा प्रमुख या नात्याने देशाची धोरणे निश्चित करणे हे माझे काम. ते माझ्या सरकारने केले. आता हे धोरण कोणास आवडते की नाही, यावर वा कोणाच्या धमकीवर प्रतिक्रिया देणे हे काही माझे काम नाही. ते मी करणारही नाही आणि त्याची गरजही नाही. आम्ही धोरण तयार केले. येथे व्यवसाय करावयाचा असेल तर तो या धोरणाधीन राहूनच करावा लागेल, हे निश्चित.’’

या अशा ठाम वक्तव्यानंतर या माहिती कंपन्या आणि हे देश यांतील तणाव अधिकच वाढला. पण तरीही प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत त्यातून ‘या माहिती कंपन्या जरा जास्तच शेफारल्या आहेत’ अशीच भावना दिसून येते. या सर्व कंपन्या अमेरिकी आहेत. पण त्यांच्या ताकदीला कात्री लावण्याचा प्रयत्नही सर्वात प्रथम अमेरिकेतच झाला, ही लक्षात घ्यावी अशी बाब. अमेरिकी नागरिक आणि लोकप्रतिनिधी यांना या ‘स्वदेशी’ कंपन्यांच्या पापाकडे काणाडोळा करावा असे वाटले नाही. ‘आपला तो बाब्या आणि दुसऱ्याचे ते कार्टे’ अशी भूमिका त्या देशाने घेतली नाही, ही आपण लक्षात घ्यावी अशी बाब. या पार्श्वभूमीवर ऑस्ट्रेलियी सरकारने स्थानिक माध्यमांच्या वतीने गूगल आणि फेसबुक यांच्याकडून महसुलात वाटा मागितला आहे. ऑस्ट्रेलियी वृत्तमजकूर विभागातून मिळणाऱ्या उत्पन्नातील १० टक्के वाटा या कंपन्यांनी स्थानिक माध्यमांना परत देण्याची अट या नव्या धोरणात आहे. त्यानुसार या कंपन्यांना ३७ कोटी डॉलर्स इतकी रक्कम परत करावी लागेल. हे एका देशाचे झाले. अशीमागणी अन्य देशांतूनही येणार. युरोपीय संघटना तर या कंपन्यांमागे हात धुऊन लागलेल्याच आहेत.तेव्हा या कंपन्यांविरोधात काही कारवाई करायची खरोखर जर धमक असेल, तर आपल्या सरकारने या देशांचा कित्ता गिरवावा. काही कारवाई नाही आणि फुकाचे शड्डू ठोकायचे यास काही अर्थ नाही. अशा ठोस कारवाईअभावी ‘कंपनी सरकार’ अशी नवी ओळख निर्माण होण्याचा धोका आहे.

## ड्रग्ज प्रकरणी दाऊदच्या भावाचा जवळचा साथीदार एनसीबीच्या जाळ्यात



मुंबई: ड्रग्ज प्रकरणाचा तपास सुरू असतानाच, एनसीबीला मोठे यश मिळाले आहे. मुंबईत एनसीबीने आरिफ भुजवाला याला रायगडमधून अटक केली आहे. आरिफ हा मोठा ड्रग डीलर असून, अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमचा भाऊ अनीश इब्राहिमचा जवळचा साथीदार असल्याचे सांगितले जात आहे. एनसीबीने केलेली ही अटकेची कारवाई दाऊद इब्राहिमसाठी मोठा झटका मानला जात आहे. आरिफ भुजवाला दाऊदचा भाऊ अनीश याचा जवळचा साथीदार असल्याचे समजते. आरिफच्या ड्रग्जच्या तस्करीतून मोठी कमाई केली आहे. आरिफकडे १०० कोटींहून अधिकची संपत्ती आहे. त्यात महागड्या गाड्या, फ्लॅट आणि भूखंड यांचा समावेश आहे.

तत्पूर्वी, एनसीबीने आरिफच्या अटकेसाठी त्याच्या लॅबवर छापे मारले होते. मात्र, आरिफ तेथून पसार झाला होता. एनसीबीच्या हाती मोठे घबाड लागले होते. ड्रग्जचा साठा आणि रोकड असा कोट्यवधींचा मुद्देमाल जप्त केला होता. आरिफ हा चिंकू पठाण याचा भागीदार आहे. चिंकू याला एनसीबीने काही दिवसांपूर्वीच अटक केली होती. चिंकू हा गँगस्टर करीम लाला याचा नातेवाइक आहे आणि त्याला नवी मुंबईतून अटक केली होती.

चिंकू हा दाऊदचा जवळचा साथीदार असल्याचे सांगितले जात आहे.

आरिफ हा अलीकडेच दोनदा दुबईला गेला होता. आरिफ ड्रग्जची लॅब चालवत होता.

तेथे मेफेड्रोन, मेथमफेटामाइन आणि एफेड्रिन यांसारखे अंमली पदार्थ एका फ्लॅटमध्ये तयार केले जात होते.

मुंबईच्या डोंगरी परिसरात ही फॅक्टरी होती. बुधवारी सकाळी मिळालेल्या माहितीच्या आधारे एनसीबीच्या पथकाने ड्रग तस्कर चिंकू पठाणला अटक केली होती.

## ‘आरटीओ’ कार्यालयात विनयभंग

ठाणे : ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) महिला कर्मचाऱ्याचा विनयभंग झाल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी कथित माहिती अधिकार कार्यकर्ता शरद धुमाळ याला वागळे इस्टेट पोलिसांनी अटक केली आहे.

धुमाळ याने गेल्या पाच वर्षांत ‘आरटीओ’ कार्यालयात सुमारे १५०० माहिती अधिकाराचे अर्ज केले होते. अशी माहिती माहितीच्या अधिकारात माहिती मिळविण्यासाठी कार्यालयात येत असतो. त्यावेळी वारंवार अश्लील शेरेबाजी तो करतो, असे पीडितेने तक्रारीत म्हटले आहे.

कार्यालयातील इतर महिलांकडे पाहूनही तो अश्लील शेरेबाजी करत असे. याबाबत काही महिलांनी विशाखा समितीकडे तक्रार दिली होती. मात्र,



उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत पाटील यांनी दिली.

पीडित महिला ठाणे प्रादेशिक परिवहन कार्यालयात लिपीक पदावर कार्यरत आहे. तर भिवंडी येथील रहिवासी असलेला शरद धुमाळ हा समितीच्या सुनावणीलाही तो गैरहजर राहत असल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, वागळे इस्टेट पोलिसांनी विनयभंग, माहिती तंत्रज्ञान कायद्याखाली गुन्हा दाखल करीत धुमाळ याला अटक केली.

## गच्चीवर व्हायचं दोन सख्ख्या मित्रांचं दुर्दैवाने दोघांचा अंतही तिथेच झाला!

कधी कधी एखादी लहानशीही चूकही भारी पडू शकते. अशीच एक घटना दिल्लीत पाहायला मिळत आहे. येथे दोन मित्र इमारतीच्या गच्चीवर जाऊन थट्टा-मस्करी करीत होते. अशातच ते छतावर खाली पडले. त्यानंतर तातडीने त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र त्यापूर्वीच दोघांचा मृत्यू झाला होता. ही घटना गीता कॉलनीतील आहे. येथे फॅक्टरीत काम करणारे दोन मित्र फॅक्टरीच्या गच्चीवर जेवायला गेले होते. यादरम्यान ते एकमेकांसोबत थट्टा-मस्करी करीत होते. यादरम्यान ते एकमेकांना गुदगुल्या करू लागला. त्यातच दोघेही गच्चीवरुन खाली पडले. खाली एका गल्लीत पडल्यानंतर जागेवरच दोघांचा मृत्यू झाला. सांगितलं जात आहे की, गच्चीवर चारही बाजूला सुरक्षित कुंपन नव्हतं. या दोघांचं नाव शफीक आणि शकील असल्याचं समोर आलं आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार शफीक कुटुंबासोबत जाफराबाद भागात राहत होता. त्याच्या कुटुंबात पत्नी आणि अन्य सदस्य आहेत.

तर शकीलही त्याच्या घराशेजारी आपल्या कुटुंबासोबत राहत होता. दोघांमध्ये चांगली मैत्री होती. शफीक आणि शकील दोघेही मुकेश दुआ नावाच्या व्यापाऱ्याच्या फॅक्टरीत काम करीत होते. या फॅक्टरीत रेडीमेंड गारमेंटरचं काम केलं जातं. फॅक्टरीच्या गच्चीवर केवळ पायऱ्यांजवळ दरवाजा लावण्यात आला आहे. गच्चीवर चारही बाजूला भिंत नाही. आज दोघे मित्र थट्टा-मस्करी करीत गच्चीवर गेले. यादरम्यान ते सज्जेजवळ आले आणि नियंत्रण गेल्यानंतर दोघेही खाली पडले.

या प्रकरणात पोलिसांनी तक्रार दाखल केली असून या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## प्रियकर भाच्याच्या मदतीनं केली नवऱ्याची हत्या, पोलिसांसमोर रचला अपहरणाचा बनाव!

उत्तर प्रदेशातील कानपूर पोलिसांच्या क्राईम ब्रँच युनिटनं एका खुनी पत्नीच्या षडयंत्राचा अडीच महिन्यानंतर पर्दाफाश केला आहे. या प्रकरणातील पत्नीनं तिचा प्रियकर असलेल्या भाच्याच्या मदतीनं तीन महिन्यांपूर्वी नवऱ्याची हत्या केली होती. त्यानंतर पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी नवऱ्याचं अपहरण झाल्याचं नाटक केलं. कानपूर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार येथील मेडिकल दुकानाचे मालक रविमोहन यांची हत्या त्यांची पत्नी रेणूनं प्रियकर महेंद्रकुमार उर्फ मोनू आणि काही नातेवाईकांच्या मदतीनं पाच ऑक्टोबर रोजी केली होती. या हत्येनंतर त्यांनी रविमोहन यांचा मृतदेह कानपूरपासून शेकडो किलोमीटर दूर टाकून दिला आणि पोलिसांकडं अपहरण झाल्याची तक्रार



केली. पोलिसांचं लक्ष विचलित करण्यासाठी रेणूनं स्वत:ची नस कापत नवऱ्याच्या मृत्यूनंतर आपण आत्महत्या करत असल्याचं नाटक केलं.

# पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार २६ जानेवारी ते ०१ फेब्रुवारी २०२१


## गांजा आणि अंमलीपदार्थाचे सेवन करणाऱ्या तस्कराच्या आवळल्या मुसक्या ; लाखोंचा माल जप्त



काशिमिरा घोडबंदर चिंचबादेवी मंदिरासमोर एक ईसम अंमली पदार्थाची विक्री करण्याकरिता येणार असल्याची गोपनीय बातमी काशिमिरा पोलीस ठाण्याला मिळाली. सदरची घटना दिनांक १८/०१/२०२१ रोजी सायंकाळी घडली. मिळालेल्या बातमीवरून काशिमिरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक. संजय हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक. विजय पवार व त्यांच्या पथकाने नमूद ठिकाणी सापळा लावून, आरोपी (वय-२४ वर्ष) राहायला. डी-मार्ट जवळ नालासोपारा (पुर्व) याला ऍक्टिवा स्कूटी सह ताब्यात घेऊन त्याच्याकडून तब्बल १० किलो ४०० ग्रॅम गांजा किंमत ३,५२,५००/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. सदर आरोपी विरोधात काशिमीरा पोलीस ठाण्यात गु.र.नं ५५/२०२१ गुंगीकारक औषधी द्रव्ये आणि मनोव्यापारांवर परिणाम करणारे पदार्थ अधिनियम १९८५ चे कलम ८ (क), २०(ब), ii (ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरचे कामगिरी श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ श्री. विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग, काशिमिरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय हजारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजय पवार तसेच पथक यांनी केली आहे.

## लग्नाचे दागिने व कपड्यांच्या बॅगांचा शोध लावण्यामध्ये नवघर पोलीसांना मिळाले यश



सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार भाईदर येथे राहणारे रहिवाशी श्री. तुकाराम परशुराम कदम हे त्यांच्या मुलीचे इंद्रवरून सभागृह, भाईंदर (पूर्व) येथे लग्न समारंभासाठी त्यांच्या पत्नी सोबत कपडे व सोन्याचे दागिने ठेवलेली बॅग घेऊन ऑटो रिक्षाने घरी जात होते. त्या वेळी रिक्षा मधून उतरताना कपडे व सोन्याचे दागिने ठेवलेली बॅग तुकाराम कदम यांची पत्नी रिक्षामध्ये विसरल्या. ही गोष्ट लक्षात आल्यानंतर तुकाराम कदम यांनी नवघर पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल केली. सदरची घटना दिनांक. ११/१२/२०२० रोजी घडली.तक्रार दाखल होताच नवघर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक काळे, पोलीस ना./१४१८ भालेराव व पथक यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन बारकाईने तांत्रिक तपास करून ऑटो रिक्षा क्रमांक एम. एच. ०४-जे. क्यू-६८९६ ही रिक्षा असल्याचे निष्पन्न झाले. रिक्षा चा शोध घेऊन रिक्षा मालक यांने सदरची ऑटोरिक्षा मोहम्मद मुस्तफा मकसूद अली याला भाड्याने चालविण्यास दिली असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून रिक्षाचालक मोहम्मद मकसूद अली चा शोध घेण्यात आला तेव्हा तो त्याच्या मूळगावी उत्तर प्रदेश येथे जाऊन दिनांक. ११/०१/२०२१ रोजी उत्तर प्रदेश येथून काशिमीरा येथे परत आल्याची माहिती मिळताच त्याला विश्वासात घेऊन तुकाराम कदम यांच्या पत्नीने रिक्षात विसरलेल्या बॅगे बाबत चौकशी केली. तेव्हा आरोपी मोहम्मद मकसूदअली याने कपडे आणि ५३.५७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने किंमत अंदाजे २,५०,०००/- रुपये असलेली बॅग अप्रामाणिकपणे स्वतःकडे ठेवून स्वतःच्या मूळ गावी नेऊन ठेवल्याचे निष्पन्न झाले. त्यावरून आरोपी मोहम्मद मकसूदअली विरुद्ध अदलखपात्र गुन्हा क्र. ०१७९/२०२१ भादवि कलम ४०३ अन्वये अदखलपात्र गुन्हा नोंद करण्यात आला. कपडे व ५३.५७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने आरोपीकडून जप्त करून नवघर पोलीसांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे.सदरची कामगिरी श्री. अमित काळे पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१ शशिकांत भोसले, सहाय्यक पोलीस आयुक्त, नवघर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक. संपतराव पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक काळे आणि पथक यांनी केली.

## आता मतदान ओळखपत्राची प्रतीक्षा संपली: मतदान ओळखपत्र झालं डिजिटल



आज राष्ट्रीय मतदान दिनानिमित्त ई-मतदान ओळखपत्राची e-EPIC (Electronic Electoral Photo Idenity Card) ॲपच्या माध्यमातून वाटप सुरु करण्यात आले आहे. आधार कार्ड, पॅन कार्ड आणि ड्रायव्हिंग लायसन्स अगोदरच आपल्याला डिजिटल स्वरूपात उपलब्ध झाले आहेत. हे डिजिटल कार्ड मतदार निवडणूक आयोगाच्या अधिकृत वेबसाईट वरून मतदारकार्ड पीडीएफ स्वरूपात डाउनलोड करू शकतात. पहिल्या टप्प्यात २५ ते ३१ जानेवारी दरम्यान नवीन मतदारांना डिजिटल वोटर कार्ड मिळणार आहे. या कालावधीमध्ये जे नवीन मतदार नोंदणी करतील त्यांना डिजिटल वोटर कार्ड मिळेल. येत्या काही महिन्यामध्ये देशातील ५ राज्यामध्ये निवडणुक लागणार आहे.


आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल आणि पॉडिचेरीमध्ये विभागसभा निवडणूक होणार आहेत, प्रत्येक नागरिकाला डिजिटल वोटर आयडी मिळू शकेल का हे पाहावे लागणार आहे. ई-मतदार ओळखपत्रासाठी सर्व प्रथम https://voterportal.gov.in किंवा https://nvsp.in/account/login या संकेत स्थळाला भेट द्या. यानंतर तुम्हाला लॉग इन करावे लागेल जर तुमचे अकाउंट नसेल तर मोबाइल नंबरच्या मदतीने तुम्ही अकॉउंट सुरु करू शकता. वेबसाईटवर लॉग इन केल्यावर Download e-EPIC या टॅबवर क्लिक करा


## मोबाईल हिसकावून पळणाऱ्या सराईताची पोलीसांनी केली धरपकड



दहिसर चेक नाका येथे एक महिला रिक्षा मधून प्रवास करीत असताना तिच्या हातातला मोबाईल हिसकावून एक इसम पळून गेला. त्यावरून महिलेने आरडाओरडा केल्याने सदर ठिकाणी कर्तव्यावर असलेले मिरारोड परिमंडळ वाहतूक शाखेचे पोलीस हवालदार/७५९ कापडणीस, पोलीस शिपाई/४८५ गुजर यांनी प्रसंगावधान राखून हजर असलेले नागरिक मेहुल थक्कर यांच्या मदतीने आरोपीचा पाठलाग केला. आरोपीला मोबाईलसह ताब्यात घेऊन काशिमीरा पोलीसांच्या ताब्यात देण्यात आले. सदरची घटना दिनांक.१७/०१/२०२१ रोजी सायंकाळच्या वेळीस घडली. आरोपी विरुद्ध काशिमीरा पोलीस ठाण्या मध्ये गु.र.नं ५०/२०२१ भा.द.वी. कलम ३९२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हाचा पुढील तपास काशिमीरा पोलीस करीत आहे

## अनधिकृत गॅरेजवर पालिकेचा हातोडा





मिळालेल्या सूत्रांच्या माहितीनुसार मीरा भाईंदर महानगर पालिकेतील प्रभाग समिती क्र.०४ अंतर्गत आरक्षण क्र.२१४ या ठिकाणी अनधिकृत गॅरेज वर दिनांक: २१/०१/२०२१ रोजी कारवाई अंतर्गत तोडण्यात आला. सदर कारवाईच्या वेळी विभाग प्रमुख श्री. नरेंद्र चव्हाण, प्रभाग अधिकारी श्रीमती. कांचन गायकवाड, कनिष्ठ अभियंता श्री योगेश भोईर, कनिष्ट अभियंता श्री. विकास शेळके, तसेच अतिक्रमण विभागाचे कर्मचारी,१ जे.सी.बी. व मनुष्यबळाच्या साहाय्याने तसेचग सुरक्षारक्षक आणि पोलीस बंदोबस्ताखाली करण्यात आले होते.

## महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना शुल्कात सवलत का नाही? : पालकांचा सरकारला आंदोलनाचा इशारा




कोरोनामध्ये केलेल्या लॉकडाऊनमुळे अनेकांच्या नोकऱ्या गेल्या. त्यामुळे बहुतांश पालकांना शुल्क भरणे शक्य होत नव्हते. ही बाब लक्षात घेऊन देशातील विविध राज्याती सरकारने विद्यार्थ्यांना शुल्कात सवलत देत त्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला. मात्र पुरोगामी समजल्या जाणाऱ्या महाराष्ट्राने मात्र याबाबत बोटचेपी भूमिका घेतल्याने पालकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे. त्यामुळे शुल्कात सवलत देण्याबाबत सरकारने २७ जानेवारीपर्यंत निर्णय घ्यावा अन्यथा ३० जानेवारीपासून शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांच्या बंगल्यासमोर आंदोलन करण्याचा इशारा राज्यातील पालकांनी दिला आहे.

लॉकडाऊनमुळे अनेक पालकांकडे शाळेचे शुल्क भरण्यासाठी पैसे नसल्याने विद्यार्थी ऑनलाईन शिक्षणपासून वंचित राहिल्याच्या अनेक घटना उघडकीस आल्या आहेत. अनेक शाळांनी तर शुल्क न भरल्याने विद्यार्थ्यांना परीक्षाही देण्यापासून रोखले. अशा अनेक घटना समोर येत असताना महाराष्ट्र सरकारने विद्यार्थी व पालकांना दिलासा देण्यासाठी कोणतीही ठोस भूमिका घेतली नाही. मात्र याउलट देशातील विविध राज्य सरकारांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कात सवलत देत दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. गुजरात सरकारने विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कामध्ये ३० टक्के सवलत देत अन्य सर्व शुल्क माफ केले. त्याप्रमाणे राजस्थान, ओडिशा, आंध्र प्रदेश सरकारने विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कामध्ये ३० टक्के सवलत दिली. त्याचप्रमाणे ओडिशा सरकारने विद्यार्थ्यांकडून अन्य कोणतेही शुल्क घेतले नाही. दिल्ली, उत्तराखंड, पंजाब, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, झारखंड आणि हरियाणा या राज्यातील सरकारने शाळांना फक्त शैक्षणिक शुल्कच घेण्याचे आदेश दिले तर अन्य सर्व शुल्क माफ केली. पंजाब सरकारने विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यानंतर त्यांचे कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर उर्वरित शुल्क माफ करण्याचे आदेश शाळांना दिले. कर्नाटक सरकारने तामिळनाडू उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार विद्यार्थ्यांना शुल्काच्या पहिल्या हप्त्यामध्ये फक्त ४० टक्के सवलत दिली तर उर्वरित शुल्क शाळा सुरू झाल्यानंतर घेण्याचे आदेश शाळांना देत पालकांना दिलासा देण्याचा प्रयत्न केला आहे. मध्य प्रदेश सरकारनेही कोरोना परिस्थिती असेपर्यंत फक्त शैक्षणिक शुल्कच घेण्याचे आदेश शाळा प्रशासनांना दिले. तर बिहार सरकारने दोन महिन्यांसाठी संपूर्ण शुल्क माफ केले. केरळ सरकारनेही २५ टक्के शुल्क माफ केले. पश्चिम बंगालने २० टक्के शैक्षणिक शुल्क माफ केले. दिल्ली, उत्तराखंड, पंजाब, छत्तीसगड, हिमाचल प्रदेश, झारखंड, राजस्थान यासारख्या मोठ्या राज्यांनी शैक्षणिक शुल्क न घेता विद्यार्थी व पालकांना दिलासा देण्याचे प्रयत्न केले असताना आसामसारख्या छोट्या राज्यानेही विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुलमध्ये २५ टक्के सवलत दिली आहे.

## आत्महत्या करणाऱ्या महिलेचे वाचविले प्राण




वर्सोवा खाडीत उडी घेतलेल्या महिलेला खाडी बाहेर काढून वाचविले प्राणवर्सोवा येथे दुपारच्या वेळेस वर्सोवा खाडीमध्ये वसई येथे राहणाऱ्या महिलेने आत्महत्या करण्याकरिता पुला खाली उडी मारली. तेव्हा मिरारोड परिमंडळ वाहतूक शाखेचे पोलीस शिपाई/३२३२ नरेश चौधरी यांनी प्रसंगावधान राहून तात्काळ वर्सोवा पुलाखाली धाव घेऊन तेथे हजर कामगारांच्या मदतीने सदर महिलेस खाडीतून बाहेर काढले. तात्काळ ऍम्ब्युलन्सची व्यवस्था करून उपचार मिळवून देण्यात आला आणि सदर महिलेचा जीव वाचविला.

## "राज्यपालांना कंगनाला भेटायला वेळ आहे, पण माझ्या शेतकऱ्यांना भेटायला वेळ नाही"

"तुम्ही राज्यपालांना निवेदन द्यायला निघाला आहात. पण महाराष्ट्राच्या इतिहासात असले राज्यपाल लाभले नाहीत. राज्यपाल गोव्याला निघून गेलेत. राज्यपालांना कंगनाला भेटायला वेळ आहे. पण माझ्या शेतकऱ्यांना भेटायला वेळ नाही." अशी जोरादार टीका राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यावर केली आहे.

तसेच, "राज्यपालांची ही नैतिक जबाबदारी होती. राज्यातला कष्टकरी, अन्नदाता त्यांना निवेदन देण्यासाठी येणार होता त्याला सामोरं येणं अपेक्षित होतं. पण त्यांच्याकडे सभ्यता नाही. निदान राजभवनात तरी बसायला हवं होतं." असं देखील शरद पवार यांनी म्हटलं आहे. केंद्र सरकारच्या नव्या कृषी कायद्यांविरोधात दिल्लीच्या सीमेवर जवळपास दोन महिन्यांपासून शेतकरी संघटना आंदोलन करत आहे. या आंदोलनास पाठिंबा देण्यासाठी आता संयुक्त शेतकरी-कामगार मोर्चाच्या नेतृत्वात महाराष्ट्रातील शेतकरी देखील एकवटले आहेत. आज(सोमवार) मुंबईतील आझाद मैदानात हजारोंच्या संख्येने जमलेल्या राज्यभरातील शेतकऱ्यांना राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार संबोधित केलं.

"ज्यांचा हातात सत्ता आहे, त्यांना देशातील कष्टकऱ्यांबद्दल कवडीची आस्था नाही"



यानंतर हे आंदोलक शेतकरी राज्यपालांना भेटून निवेदन देण्यासाठी राजभवनाकडे निघाले होते, मात्र त्यांना वाटेतच पोलिसांकडून अडवण्यात आलं. शिवाय, राज्यपाल देखील राजभवानात उपस्थित नसल्याचे समोर आल्याने, आंदोलक शेतकऱ्यांचा संताप अनावर झाला व शेतकऱ्यांनी याचा जोरदार निषेध करत, घोषणाबाजी सुरू केली. अखेर, राज्यपालांना द्यायचे निवदेन शेतकरी नेत्यांना फाडून टाकले.

या सर्व घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शरद पवार यांनी राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्यावर टीका केली आहे. तर, राज्यपालांची भेट घेतल्याशिवाय आम्ही इथून जाणार नाहीत, असा आंदोलक शेतकऱ्यांसह काँग्रेसच्या नेत्यांनी पवित्रा घेतला होता.

या अगोदर शरद पवारांनी, "ही लढाई सोपी नाही. ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांना देशातील कष्टकऱ्यांबद्दल व शेतकऱ्यांबद्दल कवडीची आस्था नाही. आपण पाहत आहात, ६० दिवस झाले उन्हातान्हात थंडी वाऱ्याचा विचार न करता शेतकरी आंदोलन करत आहेत. देशाच्या पंतप्रधानांनी कधी त्यांची चौकशी केली का?" असा प्रश्न उपस्थित केला करत, आपल्या भाषणातून मोदी सरकारवर निशाणा साधल्याचे पाहायला मिळाले.

## 98 हजार भटक्या कुत्र्यांच्या निर्बिजीकरणासाठी 13 कोटींची उधळपट्टी



मुंबई महापालिका भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रणात आणण्यासाठी अशासकीय संस्थांमार्फत हजारो कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी दरवर्षी कोट्यवधी रुपयांची उधळपट्टी करते. मात्र भटक्या कुत्र्यांची संख्या आणि या कुत्र्यांकडून लहान मुलांपासून ते मोठ्या व्यक्तींना चावण्याचे प्रमाण काही कमी होत नाही. आता भटक्या कुत्र्यांच्या निर्बीजीकरणासाठी प्रति कुत्र्यासाठी अशासकीय संस्थांना देण्यात येणार आहेत . या दरात सरसकट ४०० रुपयांची वाढ करणार असून पुढील तीन वर्षात ९८ हजार १०० कुत्र्यांचे निर्बिजीकरणासाठी प्रति कुत्र्यामागे सरासरी १ हजार ३६५ रुपये याप्रमाणे ७ अशासकीय संस्थांवर तब्बल १३ कोटी ३९ लाख ४१ हजार ६०० रुपयांची रक्कम उधळणार आहे. यासंदर्भातील प्रस्ताव स्थायी समितीच्या आगामी बैठकीत मंजुरीसाठी येणार आहे.

या ७ संस्थांनी पालिकेच्या मदतीने गेल्या २०१४ ते २०१९ या ६ वर्षाच्या कालावधीत फक्त ९० हजार ७०३ कुत्र्यांचे निर्बिजीकरण शक्य झाले आहे. याबाबतचे गणित केल्यास या संस्थांनी दरवर्षी सरासरी फक्त १५ हजार ११७ कुत्र्यांचे निर्बीजीकरण केल्याचे समोर येते. तर दरमहा फक्त १ हजार २५९ भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण केले आहे. तसेच, दर दिवसाचे गणित केल्यास ७ संस्था असूनही दिवसभरात १ -२ कुत्र्यांचे निर्बीजीकरण केले जात असल्याचे म्हणजेच कोट्यवधी रुपये खर्चूनही कासवगतीने निर्बीजीकरणाचे काम होत असल्याची सत्यता समोर येत आहे.

हिंदीत असे म्हटले जाते की, जब हाल यह है तो आलम क्या होगा. भटक्या कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणाऱ्या संस्थांचे कामाचा लेखाजोखा व आकडेवारी पाहिल्यास ६ वर्षात फक्त ९० हजार ७०३ कुत्र्यांचे निर्बीजीकरण झाल्याने एवढया मंदगतीने काम केले जात असेल तर आता पुढील तीन वर्षात ९८ हजार १०० कुत्र्यांचे निर्बीजीकरण करणे कसे काय शक्य होईल, असा सवाल सर्वसामान्यांसमोर उपस्थित होत आहे.

## हँकॉक पूल पुनर्बांधणी; समन्वयकाला आणखीन दीड कोटी रुपयांची खैरात

मध्य रेल्वेच्या भायखळा व सॅण्डहर्स्ट रोड रेल्वे स्थानका दरम्यान असलेल्या हेंकॉक पुलाचे रखडलेले काम आता आणखीन काही महिने लांबणार आहे. तसेच, या कामासाठी नेमलेल्या मे.राईट्स या समन्वयकाला या कंत्राटकामासाठी देण्यात येणारी १ कोटी ८० लाख रुपयांची रक्कम आणखीन १ कोटी ३७ लाख ५२ हजार रुपयांनी वाढविण्यात येणार आहे. त्यामुळे त्याला एकूण ३ कोटी १७ लाख ५२ हजार रुपये देण्यात येणार आहेत.

सध्या या पुलाच्या ठिकाणी एक मोठा गर्डर टाकण्यात आला आहे. मात्र आणखीन एक गर्डर टाकणे आणि अन्य कामे बाकी आहेत. त्यामुळे या कामाला आणखीन काही महिन्यांचा कालावधी लागणार आहे. वास्तविक, हा पूल धोकादायक ठरल्याने त्याचे पाडकाम ९ जानेवारी २०१६ रोजी करण्यात आले होते. तर सदर कामाचे प्रकरण कोर्टात गेल्याने २ वर्षे काम रखडले होते. या पुलाच्या बांधकामाला प्रत्यक्षात २०१८ ला सुरुवात करण्यात आली. या पुलाचे काम साई प्रोजेक्ट्स या



कंत्राटदाराला देण्यात आले. हे काम १२ महिन्यात होणे अपेक्षित असताना आता पुलाचे काम लांबले आहे. आता ह्या पुलाचे काम १५ महिन्यांनी वाढवल्याने ७ ऑक्टोबर २०२१ रोजी पूर्ण होणे अपेक्षित आहे.

पुलाचे बांधकाम करताना पुलाखालून जाणारी ओव्हरहेड वायरचे स्थलांतरण करण्यासाठी रेल्वेला सुमारे ३९ कोटी ३ लाख रुपये पालिकेच्या वतीने देण्यात आले असल्याचेही पूल विभागाने म्हटले आहे. तर पुलाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराला ५१ कोटी रुपये देण्यात येणार आहेत. आता पुलाच्या कामाचा कालावधी वाढल्याने कंत्राटदारालाही कंत्राट रकमेत आणखीन वाढ करून दिली जाणार हे निश्चित. मात्र तोपर्यंत या पुलाचा वापर याअगोदरपासून करणाऱ्या नागरिकांचे हाल होणार आहेत. पुलाचे काम कधी एकदा पूर्ण होणार याची स्थानिक नागरिक चातकासारखी वाट पाहत आहेत.

**सध्या या पुलाच्या ठिकाणी एक मोठा गर्डर टाकण्यात आला आहे. मात्र आणखीन एक गर्डर टाकणे आणि अन्य कामे बाकी आहेत.**


हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत ).संपर्क:-9594418181 / 8424989898